# सचिवालय जिमखाना, मुंबई.

## उपविधी

# सचिवालय जिमखाना, मुंबई, नियम व विनियम

**१. नाव :**

जिमखान्याचे नाव **"सचिवालय जिमखाना→** असे असेल.

**कार्यालयाचा पत्ता**:- ६, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

**२. मानद आश्रयदाता :**

मा. राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री आणि महाराष्ट्र सरकारचे मुख्य सचिव हे मानद आश्रयदाता असतील.

**३. आश्रयदाता सभासद :**

व्यवस्थापकीय समितीने अधीस्वीकृत केलेल्या कोणत्याही प्रतिष्ठित व्यक्तिमत्वाची व्यवस्थापकीय समितीने ठरविल्याप्रमाणे आर्थिक सहाय्याची रक्कम भरल्यानंतर, अशा स्वीकृत व्यक्तीची आश्रयदाता सभासद म्हणून नोंदणी केली जाऊ शकते. आश्रयदाता सभासदाला खेळाचे शुल्क वगळता इतर कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही. जिमखाना एका वित्तीय वर्षात जास्तीत जास्त दोन आश्रयदाता सभासदांची नोंदणी करेल.

**४.आजीव-सभासद :**

महाराष्ट्र शासनाच्या नागरी सेवांमध्ये नियमितपणे नियुक्त केलेली, कोणतीही व्यक्ती ज्या व्यक्तींची महाराष्ट्र नागरी सेवेत किमान दोन वर्षे अखंड सेवा पूर्ण झालेली आहे आणि ज्यांच्या सेवा बृहन्मुंबईच्या बाहेर बदलीपात्र नाहीत, अशा व्यक्तीची व्यवस्थापकीय समितीने वेळोवेळी ठरवल्याप्रमाणे, त्या व्यक्तीने आजीव सभासद शुल्क भरल्यावर, जिमखान्याचे आजीव सभासद म्हणून नावनोंदणी केली जाऊ शकते.

आणि असे की, महाराष्ट्र शासनाच्या नागरी सेवांमध्ये नियमितपणे नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, जी आजीव सभासद बनू इच्छिते/इच्छितो आणि जीच्या/ज्यांच्या सेवा बृहन्मुंबईबाहेर हस्तांतरित केल्या जाऊ शकतात, अशा व्यक्तीने राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा/ कला स्पर्धांमध्ये किंवा अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली असेल त्याला / तिला व्यवस्थापकीय समितीकडून विचार केला जाऊ शकतो, अन त्याचे/ तीचे आजीव सभासद म्हणून नाव नोंदणी केली जाऊ शकते.

**५. सर्वसाधारण सभासद :**

व्यवस्थापकीय समितीच्या मान्यतेने बृहन्मुंबईतील महाराष्ट्र शासनाच्या नागरी सेवांमध्ये नियमितपणे नियुक्त केलेली परंतु ज्यांच्या सेवा बृहन्मुंबईबाहेर बदलीपात्र आहेत, अशा कोणत्याही व्यक्तीने प्रवेश शुल्क आणि सर्वसाधारण सभासद शुल्क (सहामाही) भरल्यावर, सर्वसाधारण सभासद म्हणून नोंदणी

केली जाऊ शकते. वरील शुल्काव्यतिरिक्त, सर्वसाधारण सभासदाला किमान एका खेळाचे सहा महिने आगाऊ शुल्कदेखील भरावे लागेल.

**६. मानद सभासद :**

**अ) सभासदत्व** :-

ज्या व्यक्ती बृहन्मुंबईमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सेवेत आहेत आणि ज्या व्यक्ती जिमखान्याचे उद्दीष्टांशी सहमत आहेत त्या व्यक्तींसाठी जिमखान्याचे सभासदत्व खुले असेल. (आश्रयदाता वगळता).

**ब) मानद कुटुंब सभासदाची नावनोंदणी:-**

आश्रयदाता सभासद, आजीव सभासद आणि सर्वसाधारण सभासद यांचे (पती/पत्नी) आणि मुले (कमाल दोन फक्त) यांची मानद कुटुंब सभासद म्हणून नोंदणी केली जाईल आणि असे सभासदत्व संबंधित सभासदाच्या सभासदत्वाशी सामाईक (co-terminus) असेल.

**क) अभ्यागत सभासद:-**

अ) एखाद्या विशिष्ट खेळात आणि नाटकासह सांस्कृतिक क्षेत्रात चांगली प्रतिष्ठा आणि प्राविण्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीची, व्यवस्थापकीय समितीद्वारे एक वर्षाच्या कालावधीसाठी अभ्यागत सभासद म्हणून नोंदणी केली जाऊ शकते. विशिष्ट कार्यक्रमासाठी अशी नोंदणी केलेल्या अभ्यागत सभासदाची एकूण संख्या ही संघातील एकूण सभासदांच्या १/२ जास्त नसावी.

आ) अभ्यागत सभासदाच्या नोंदणीमुळे जिमखान्याच्या सभासदांच्या अधिकारावर कोणताही परिणाम होणार नसेल आणि संघात जिमखाना सभासदांची कमतरता असेल, तेव्हाच अभ्यागत सभासदांची नावनोंदणी केली जाईल .

इ) अभ्यागत सभासदाला सदर नियमांखाली विहीत केलेले कोणतेही प्रवेश शुल्क/सामान्य सभासद शुल्क/खेळ शुल्क भरावे लागणार नाही.

ई) अभ्यागत सभासदाच्या समावेशामुळे कोणत्याही जिमखाना खेळाडूला त्रास होणार नाही याची व्यवस्थापकीय समितीने खात्री केली पाहिजे.

**७. निमंत्रित सभासद:**

व्यवस्थापकीय समिती एका वर्षाच्या कालावधीसाठी, राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या आणि कोणत्याही खेळात किंवा कोणत्याही सांस्कृतिक क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या व्यक्तीला, एका वर्षाच्या कालावधीसाठी "**निमंत्रित सभासद**" होण्यासाठी आमंत्रित करू शकते. अशा सभासदाला नियमांनुसार विहित केलेले कोणतेही प्रवेश शुल्क/वर्गणी/खेळ शुल्क भरावे लागणार नाही.

**८. सर्वसाधारण सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार :**

अ) नियम क्र. ६ मध्ये नमूद केल्यानुसार, शुल्क भरून जिमखान्याद्वारे प्रदान केलेल्या सुविधांचा लाभ घेण्याचा अधिकार सर्वसाधारण सभासदाला असेल.

ब) सर्वसाधारण सभासदाला मतदानाचा अधिकार असणार नाही.

क) सर्वसाधारण सभासद जिमखान्याची निवडणूक लढविण्यास पात्र असणार नाही.

ड) सर्वसाधारण सभासदाला पदाधिकारी किंवा कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून नियुक्ती देता येणार नाही.

ई) सर्वसाधारण सभासदाला जिमखान्याच्या स्थावर किंवा इतर मालमत्तेमध्ये स्वारस्य असणार नाही.

**९. आजीव सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार:**

अ) आजीव सभासदाला जिमखान्याद्वारे खेळण्याचा आणि उपलब्ध केलेल्या सर्व सुविधांचा लाभ घेण्याचा अधिकार असेल. आजीव सभासदाला जिमखान्याच्या स्थावर किंवा इतर मालमत्तेमध्ये स्वारस्य असेल. आजीव सभासदाला मतदान करण्याचा अधिकार असेल.

ब) आजीव सभासदाला मतदान करण्याचा, निवडणुक लढविण्याचा अधिकार असेल आणि तो जिमखान्याचा पदाधिकारी किंवा कोणत्याही समितीचा सदस्य होण्यासाठी नियम २१ (सी)(अ) मधील तरतुदीनुसार पात्र असेल.

परंतु, नियतवयोमानाने सेवानिवृत्त झाल्यानंतर किंवा सेवेतून स्वेच्छानिवृत्ती, राजीनामा आणि सेवेतून बडतर्फी, यापैकी जे अगोदर घडेल, त्यावेळी तो/ ती निवडणूक लढवू शकणार नाही किंवा कोणत्याही समितीचा सदस्य किंवा कार्यकारिणी पदाधिकारी सदस्य होऊ शकणार नाही.

**१०. मानद आश्रयदाता, मानद अभ्यागत सभासद, सर्वसाधारण सभासद आणि निमंत्रित सभासद यांचे अधिकार आणि विशेषाधिकार:**

मानद आश्रयदाता, सर्वसाधारण सभासद, कौटुंबिक सभासद, अभ्यागत सभासद, निमंत्रित सभासद यांना तसेच त्यांच्या पती/पत्नी यांना मतदान करण्याचा आणि निवडणूक लढविण्याचा अधिकार असणार नाही आणि तो/ ती जिमखान्याचा पदाधिकारी किंवा इतर कोणत्याही समितीचा सदस्य होण्यास पात्र असणार नाही.

**११. सेवानिवृत्तीनंतर सभासदत्व चालू ठेवणे :**

शासकीय सेवक असताना आश्रयदाता/आजीव सभासद म्हणून नावनोंदणी केलेल्या सभासदांचे सदस्यत्व त्यांच्या शासकीय सेवेतील सेवानिवृत्तीमुळे रद्द होणार नाही.

परंतु, शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यावर आजीव सभासद निवडणूक लढविण्यास पात्र असणार नाही आणि किंवा कोणत्याही समितीचा किंवा कार्यकारिणीचा पदाधिकारी सदस्य होऊ शकणार नाही.

**१२. सभासदांचा प्रवेश :**

अ) जिमखान्याचा सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने विहित नमुन्यात जिमखान्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे. असा अर्ज नियमांतर्गत विहित केलेल्या देय रकमेसह आणि जेथे लागू असेल तेथे प्रवेश शुल्कासह सादर करणे आवश्यक आहे.

ब) इच्छुक सभासदांचे अर्ज, ज्यांची जिमखान्याकडे कोणतीही वर्गणी/ शुल्क याची थकबाकी किंवा कोणतीही रक्कम देय नाही, अशा आजीव सभासदांद्वारे प्रस्तावित व अनुमोदित केले जातील.

क) व्यवस्थापकीय समितीला कारण देऊन सभासदत्वासाठी प्राप्त झालेला कोणताही अर्ज नाकारण्याचा अधिकार असेल तथापी, त्याची कारणमिमांसा दिली जाईल व अर्जदारास निर्णय कळविला जाईल. आणि अर्ज नाकारल्यास अर्जदाराने भरलेले शुल्क अर्जदारास परत केले जाईल. अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा व्यवस्थापकीय समितीचा निर्णय, अर्जदारास जिमखान्याच्या व्यवस्थापकाच्या स्वाक्षरीने कळविला जाईल.

ड) नवीन सभासदांची नावनोंदणी करताना त्यांचे नाव, पत्ता, प्रवेशाची तारीख, वर्ग आणि सभासद क्रमांक इत्यादी माहितीची नोंद ठेवण्यात येईल आणि जिमखान्याच्या सूचना फलकावर व वेबसाईटवर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल.

इ) मानद आश्रयदाता / मानद कुटूंब सभासद/ मानद अभ्यागत सभासद/निमंत्रित सभासदाला सभासदत्वासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

**अ) सभासदत्वासाठी अपात्रता:-**

१) सभासदत्व धारण करते वेळी महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेली कोणतीही व्यक्ती, जिमखान्याचा सभासद होण्यास पात्र नाही.

२) पोलिस गणवेशधारी सेवेतील कोणतीही व्यक्ती.

**ब) मासिक वर्गणीमधून सूट-**

मानद आश्रयदाता, आश्रयदाता, आजीव सभासद, मानद अभ्यागत सभासद, यांना नावनोंदणी शुल्क आणि मासिक वर्गणीतून सूट देण्यात आली आहे.

**१३. सभासदत्व आणि फी:**

अ) सभासदत्वाच्या वर्गवारीसाठी जिमखान्याला देय रकमेसह (केवळ धनादेश ) सभासदत्वासाठी भरलेले अर्ज, व्यवस्थापकीय समितीच्या सभासदत्वाच्या मंजुरीनंतरच विचारार्थ स्वीकारले जातील. अशी सभासदत्वे व्यवस्थापकीय समितीच्या मान्यतेच्या तारखेपासून स्वीकृत मानली जातील.

ब) व्यवस्थापकीय समितीने सभासदत्वासाठी अर्ज मंजूर केल्यानंतरच अर्जदाराला जिमखान्याच्या क्रीडा सुविधांचा लाभ घेता येईल.

**खेळ शुल्क भरणे इत्यादी:-**

आश्रयदाता सभासद, आजीव सभासद, सर्वसाधारण सभासद आणि मानद कुटुंब सभासद यांनी व्यवस्थापकीय समितीने वेळोवेळी ठरविल्यानुसार खेळ शुल्क, इतर उपक्रम शुल्क आणि इतर शुल्क (उदा. लॉकर इ.) याची सहा महिन्यांची रक्कम आगाऊ भरणे आवश्यक आहे.

**१४. थकबाकीदार:-**

अ) शुल्क देय झाल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी सभासदत्व/शुल्काची थकबाकी असलेल्या सभासदाला याबाबत रितसर माहिती लिखित स्वरूपात दिली जाईल आणि जर सदर सभासदाने अशा थकबाकीची रक्कम अशी सूचना मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत भरली गेली नाही, तर अशा सभासदाचे नाव सूचना फलकावर थकबाकीदार म्हणून प्रदर्शित केले जाईल आणि सदर सदस्याने असे नाव प्रदर्शित झाल्यानंतर ही एक महिन्यात थकबाकी भरली नाही तर त्याचे नाव सूचना फलकावर प्रदर्शित केल्याच्या तारखेपासून एक महिन्यानंतर सभासदांच्या यादीतून काढण्यात येईल.

ब) व्यवस्थापकीय समितीने वेळोवेळी ठरविल्यानुसार सर्व थकबाकी दंडासह भरल्यास व्यवस्थापकीय समिती अशा थकबाकीदार सभासदास पुन्हा सभासदत्व देऊ शकते.

क) निवडणूकीपूर्वी एक महिना अगोदर जो सभासद कोणत्याही वर्गणी/शुल्क रक्कमेचा थकबाकीदार आहे आणि जर त्याने थकबाकीची रक्कम पूर्णपणे भरली नाही तर अशा सभासदास निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

**१५. सभासदाने नियम आणि उपविधींचे पालन करणे:**

प्रत्येक सभासदाला जिमखान्याचे सध्या अंमलात असलेले आणि वेळोवेळी सुधारणा केलेले नियम व विनियम यांचे पालन करणे बंधनकारक असेल. असे सर्व नियम व विनियम त्याला/ तिला बंधनकारक असतील.

**१६. निष्कासित करण्याचे अधिकार:**

अ) व्यवस्थापकीय समितीला मिळालेल्या माहितीच्या आधारे खात्री पटली की एखादा सभासद गैरवर्तनासाठी दोषी आहे किंवा जिमखान्याच्या हिताला बाधा येईल अशा गोष्टी करत आहे, तर समिती अशा सभासदाला त्याला/तिला आपले म्हणणे सादर करण्यास सांगेल तसेच अशा सभासदाला त्याचे/तिचे सभासदत्व रद्द का करू नये, अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस देईल.

ब) सभासदाकडून प्राप्त झालेले स्पष्टीकरण व्यवस्थापन समितीकडून विचारात घेण्यात येईल. समिती आवश्यकतेनुसार अशा अनुषंगाने पुरावे नोंदवील किंवा चौकशी करेल.

क) व्यवस्थापकीय समितीला या संदर्भात सर्वसाधारण सभेच्या निर्णयाच्या अधिन राहून, अशा सभासदाचे सभासदत्व निलंबित करण्याचा आणि त्याला/तिला त्याच्या/तिच्या विशेषाधिकारांचा वापर करण्यापासून रोखण्याचा अधिकार असेल.

ड) सभासदाने गैरवर्तणूक किंवा जिमखान्याच्या हिताला बाधा येईल अशा गोष्टी केल्याच्या निष्कर्षाची प्रत व्यवस्थापन समितीकडे आल्यास अशा सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याची शिफारस व्यवस्थापन समिती सर्वसाधारण सभेस करेल. अशा वेळी व्यवस्थापकीय समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सर्वसाधारण किंवा विशेष सर्वसाधारण सभेमध्ये २/३ बहुमताने शिफारस मान्य केली गेल्यास त्या सभासदाचे सभासदत्व आपोआपच रद्द होईल.

**१७. सभासदत्व समाप्ती:**

जिमखान्याच्या कोणत्याही वर्गातील सभासदाचे सभासदत्व खालील कारणास्तव समाप्त केले जाईल:-

अ) सभासदाकडून व्यवस्थापन समितीकडे प्राप्त झालेला आणि त्यांच्याकडून मंजूर झालेला राजीनामा.

ब) सभासद शासकीय सेवेतून बडतर्फ झाल्यास किंवा त्याला सेवेतून काढून टाकण्यात आल्यास.

क) नैतिक पतन समाविष्ट असलेल्या गुन्ह्यासाठी न्यायालयाने सदर सभासदाला दोषी ठरविले आहे, असे व्यवस्थापकीय समितीचे मत झाल्यास.

ड) सभासदाला दिवाळखोर ठरवल्यास;

ई) सभासदाने वर्गणी, फी किंवा इतर देय रक्कम न भरल्यास आणि नियम १४ अंतर्गत तरतूद केल्यानुसार सभासदाला थकबाकीदार घोषित केल्यास;

उ) सभासदाला नियम १६ अंतर्गत काढून टाकल्यास

ऊ) सभासद राज्य शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्यावर त्याचे सर्वसाधारण सभासदत्व बंद होईल.

**१८. जिमखाना मालमत्तेवरील हक्क जप्त करणे:**

ज्या व्यक्तीचे जिमखान्याचे सभासदत्व समाप्त होते त्यास जिमखान्याची मालमत्ता आणि निधी यावरील सर्व हक्क सोडून द्यावे लागतील.

**१९. व्यवस्थापन समिती आणि तिची संरचना:**

**अ) व्यवस्थापकीय समितीची रचना-**

व्यवस्थापकीय समितीमध्ये जास्तीत जास्त १५ सदस्यांचा समावेश असेल, त्यापैकी १२ निवडून आलेले सदस्य असतील आणि नियम २१-अ मध्ये विहीत केल्यानुसार स्वीकृत सदस्य म्हणून घेतले जातील.

आणि निवडून आलेल्या १२ सदस्यांपैकी;

(१) दोन जागा महिला सदस्यांसाठी राखीव असतील आणि ;

(२) ज्या खेळाडूने आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावर भाग घेतला आहे किंवा ज्याने अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा/ कला स्पर्धेत भाग घेतला आहे त्यांच्यासाठी दोन जागा राखीव असतील.

(३) आठ (८) जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव असतील. ("सर्वसाधारण" म्हणजे सर्वांसाठी खुले राहील) परंतु जर एकच उमेदवार (i) (ii) आणि (iii) मध्ये नमूद केलेल्या एकापेक्षा जास्त प्रवर्गातून

निवडून आला असेल, तर त्याला/ तिला निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत फक्त एक जागा ठेवण्याचा आणि दुसऱ्या जागेवरुन निवृत्त व्हावे लागेल. अशी रिक्त जागा सदर प्रवर्गातील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वाधिक मताधिकऱ्याकडून भरली जाईल.

**ब) पदसिद्ध अध्यक्ष आणि उपाध्यक्ष:-**

मुख्यमंत्री पदसिद्ध अध्यक्ष असतील आणि मुख्य सचिव किंवा मुख्य सचिवांनी नामनिर्देशित केलेले अतिरिक्त मुख्य सचिव हे पदसिद्ध उपाध्यक्ष असतील.

**क) व्यवस्थापकीय समितीची बैठक:-**

1. व्यवस्थापकीय समितीची साधारणपणे महिन्यातून एकदा बैठक घेतली जाईल.
2. व्यवस्थापकीय समितीची बैठक घेण्यापूर्वी तीन दिवसांची लेखी स्वरूपात नोटीस दिली जाईल.
3. अत्यंत तातडीच्या प्रकरणांमध्ये, सभापतींना अल्प मुदतीची बैठक बोलावण्याचा किंवा सदस्यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेऊन निर्णय घेण्याचे अधिकार असतील व ते निर्णय व्यवस्थापकीय समितीच्या पुढील बैठकीत रितसर ठेवले जातील आणि अभिलिखित केले जातील.
4. सभापती व्यवस्थापकीय समितीच्या सर्व बैठकांच्या अध्यक्षस्थानी असतील आणि त्यांना निर्णायक मताचा अधिकार असेल.
5. सभापती अनुपस्थित असल्यास, उपसभापती सभेचे अध्यक्षस्थानी असतील, आणि जर सभापती आणि उपसभापती दोघेही अनुपस्थित असतील तर, उपस्थित सदस्यांनी निवडलेला कोणताही अन्य सदस्य व्यवस्थापकीय समितीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल.

**ड) व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांची उपस्थिती :-**

१) व्यवस्थापकीय समितीचा कोणताही सदस्य जो रितसर बोलावलेल्या बैठकीला उपस्थित राहू शकत नाही, त्याने आपली बैठकीस उपस्थित राहण्याची असमर्थता माननीय सभापती, माननीय उपसभापती/ मानद महासचिव यांना अगोदर कळवावी आणि क्रमांक १९ (ड) (२) मधील तरतुदीच्या अधीन राहून अनुपस्थितीची परवानगी घ्यावी.

२) व्यवस्थापकीय समिती सदस्यांना वर्षभरात समितीच्या किमान ७५% बैठकांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**इ) व्यवस्थापकीय समितीच्या बैठकीतील निर्णय (प्रोसिडिंग्ज):-**

अ) व्यवस्थापकीय समितीच्या बैठकीतील निर्णय मानद महासचिव किंवा सहसचिव यापैकी एकाकडून इतिवृत्त वहीमध्ये नोंदविले जातील, ते सर्व बैठकांचे निर्णय आणि बैठकीत झालेल्या कार्यवृत्तांताची विश्वासूपणे नोंद करतील. बैठकीच्या इतिवृत्ताचे पुढील बैठकीत वाचन केले जाईल आणि ते ज्या बैठकीत नोंदवले गेले असतील त्या बैठकीच्या अध्यक्षांकडून त्यावर स्वाक्षरी केली जाईल.

ब) इतिवृत्त नोंदवही ही बैठकीच्या कार्यवृत्तांताचा प्रथमदर्शनी पुरावा असेल

क) वरील (अ) आणि (ब) च्या अधीन राहून व्यवस्थापकीय समिती त्यांच्या बैठका आणि त्यांच्या कामकाजासाठी वेळोवेळी नियम तयार करू शकते आणि पदाधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि कार्ये विहित करू शकते.

**२०. बैठक आणि गणसंख्या:**

अ) व्यवस्थापकीय समितीचे सात सदस्य सभेला उपस्थित असतील तर त्या सभेची गणपुर्ती होईल.

ब) व्यवस्थापकीय समितीच्या बैठकीसाठी नियुक्त केलेल्या वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत गणपुर्ती नसेल तर, सदर बैठक तहकूब केली जाईल, आणि सदर बैठक तहकूब केल्यापासून अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी आणि त्याच तारखेला कार्यसूचीमध्ये दर्शविलेल्या विषयांबाबत पुढे सुरु होईल. अशा तहकूब झालेल्या बैठकीच्या वेळी उपस्थित असलेले सभासद गणपूर्ती करतील.

**२१. व्यवस्थापकीय समितीचे अध्यक्ष:-**

**अ) व्यवस्थापकीय समितीसाठी स्वीकृत सदस्यासाठी नामांकन** :

व्यवस्थाकीय समितीची निवडणूक झाल्यानंतर मा. पदसिद्ध उपाध्यक्ष, स्वतः च्या विवेकबुद्धीने क्रीडा उपक्रमांशी संबंधित आणि जे व्यवस्थापकीय समितीचे सदस्य होण्यास पात्र आहेत अशा तीन आजीव सदस्यांना स्वीकृत सदस्य म्हणून व्यवस्थापकीय समितीवर नामनिर्देशित करतील. असे नामनिर्देशित सदस्य व्यवस्थापकीय समितीच्या कार्यकाळापर्यंत पदावर राहतील.

परंतु, असा स्वीकृत सदस्य त्याच्या कार्यकाळात सेवेतून निवृत्त/ राजीनामा / बडतर्फीमुळे सेवेत न राहिल्यास व्यवस्थापकीय समितीचे सदस्य म्हणून काम बंद करेल. अशा परिस्थितीत सदर रिक्त पदावर उर्वरित कार्यकाळासाठी मा. पदसिद्ध उपाध्यक्ष दुसऱ्या आजीव सदस्याला स्वीकृत सदस्य म्हणून नामनिर्देशित करतील.

**ब) निवडून आलेले सभापती, उपसभापती व पदाधिकारी :-**

व्यवस्थापकीय समिती दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर लगेचच तिच्या पहिल्या सभेत, खालील पदांसाठी आपापसातील एकाची निवड करतील,

अ) सभापती

ब) उपसभापती आणि

क) खालील पदाधिकारी:

१) एक मानद महासचिव

२) तीन मानद सहसचिव

३) एक मानद खजिनदार

या पदाधिकाऱ्यांची निवड केवळ निवडून आलेल्या सदस्यांमधून आणि / किंवा नामनिर्देशीत सदस्यांमधून केली जाईल.

**क) व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांची निवृत्ती:-**

अ) व्यवस्थापकीय समिती दर तीन वर्षांनी विसर्जित केली जाईल आणि नवीन व्यवस्थापकीय समितीसाठी निवडणूक घेतली जाईल, परंतु विसर्जित व्यवस्थापकीय समितीचे सदस्य पुन्हा निवडणुकीसाठी पात्र असतील. तथापि, नवीन व्यवस्थापकीय समिती स्थापन होईपर्यंत विद्यमान व्यवस्थापकीय समिती कार्यभार सांभाळेल.

परंतु, कोणताही आजीव सभासद त्याच्या सभासदत्वाच्या कालावधीत सलग २ मुदतींपेक्षा जास्त वेळा (०६ वर्षे) व्यवस्थापकीय समितीचा सदस्य असणार नाही. परंतु पुढे असे की, कोणताही आजीव सभासद त्याच्या नियतवयोमान, सेवानिवृत्तीनंतर किंवा त्याच्या स्वेच्छासेवानिवृत्तीनंतर किंवा सेवेचा राजीनामा दिल्यानंतर किंवा सेवेतून काढून टाकल्यानंतर किंवा बडतर्फ केल्यानंतर तो व्यवस्थापकीय समितीचा सदस्य राहू शकत नाही.

ब) *कोणत्याही वर्षात मृत्यू, राजीनामा, पद सोडल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणाने एखादी जागा रिक्त होत असेल, तर अशी जागा अन्य सदस्याच्या स्वीकृतीने भरली जाईल व ज्या सदस्याचा मृत्यू झाला असेल, त्याने राजीनामा दिला असेल किंवा पद सोडले असेल अशा सदस्याच्या उर्वरित कार्यकाळानंतर असे स्वीकृत पद स्वीकृतीसह समाप्त होईल.*

परंतु, अशी स्वीकृती पर्याय नियम क्रमांक २१ (सी)(अ) मधील तरतुदीशी सुसंगत असेल.

**ड) व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांचा कार्यकाळ:-**

व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांचा कार्यकाळ तीन वर्षांच्या कालावधीसाठी असेल. स्वीकृत सदस्यांचा कार्यकाळ व्यवस्थापकीय समितीचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत असेल.

**ई) मानद क्षमता:-**

व्यवस्थापकीय समितीचे सर्व सदस्य मानद या क्षमतेअंतर्गत कार्यरत असतील.

**फ) व्यवस्थापकीय समिती सदस्यांची निवडणूक:-**

व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांची निवडणूक परिशिष्ट-१ येथे स्पष्ट केलेल्या नियमांनुसार होईल.

**ग) व्यवस्थापकीय समिती सदस्याची पात्रता आणि अपात्रता:-**

अ) व्यवस्थापकीय समितीची निवडणूक लढवू इच्छिणारा सभासद नामनिर्देशन दाखल करण्याच्या तारखेला किमान दोन वर्षे सलग कालावधीसाठी जिमखान्याचा आजीव सभासद असेल आणि त्या सभासदाची त्या तारखेला त्याच्या/तिच्या वर्गणीची थकबाकी नसावी.

ब) अपात्रता- असा कोणताही सभासद की जो जिमखान्यामध्ये कर्मचारी म्हणून कार्यरत आहे किंवा तत्सम क्षमतेने लाभाचे पद धारण करीत आहे किंवा त्याचे मानसिक संतुलन ठीक नसल्यामुळे किंवा तो दिवाळखोर घोषित झाला आहे किंवा नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरला आहे असा सभासद व्यवस्थापकीय समितीच्या निवडणुकीसाठी पात्र असणार नाही..

टीप : या उप-नियमाच्या उद्देशासाठी "आर्थिक लाभा→ मध्ये कोणत्याही क्षमतेनुसार मोबदला, कमिशन किंवा तत्सम याव्दारे जिमखान्याला पूर्णवेळ किंवा अर्धवेळ सेवा प्रदान करणे समाविष्ट असेल.

क) व्यवस्थापकीय समितीच्या सदस्याचे खालील आकस्मिक परिस्थितीत आपले पद धारण करणे बंद होईल;

१) त्याचे मानसिक संतुलन ठीक नसेल किंवा त्याला दिवाळखोर घोषित केल्यास किंवा त्याला नैतिक पतनाचा समावेश असलेल्या कोणत्याही गुन्ह्यासाठी दोषी ठरविल्यास ;

२) व्यवस्थापकीय समितीच्या सलग तीन बैठकांना गैरहजेरीच्या परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यास;

३) सलग सहा कॅलेंडर महिन्यांच्या कालावधीसाठी भारताबाहेर राहिल्यास ;

४) व्यवस्थापकीय समितीने त्याचा राजीनामा स्वीकृत केल्यास ;

५) जिमखान्याच्या उद्देशास /हितास बाधा पोहचेल असे कोणतेही कृत्य केल्यास.

ड) व्यवस्थापकीय समितीच्या सदस्याला वार्षिक सर्वसाधारण सभेने किंवा या उद्देशासाठी बोलावलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत पारित केलेल्या ठरावाद्वारे साध्या बहुमताने पदावरून काढून टाकले जाऊ शकते:

परंतु, काढून टाकल्या जाणाऱ्या सदस्याला त्याला काढण्याची कारणे सांगितल्याशिवाय आणि त्यावर उत्तर देण्याची  त्याला संधी दिल्याशिवाय आणि ती कारणे आणि निवेदने, जर असतील तर, वार्षिक सर्वसाधारण/विशेष सर्वसाधारण सभेपुढे सादर केल्याशिवाय असा कोणताही ठराव संमत केला जाणार नाही.

**२२. उप-समिती:**

अ) व्यवस्थापकीय समितीला समितीमधील आणि / किंवा जिमखान्याच्या इतर सभासदांमधील सभासदांची जिमखान्याच्या बाबींशी संबंधित विशिष्ट हेतूंसाठी उपसमिती स्थापन करण्याचा अधिकार असेल.

ब) व्यवस्थापकीय समितीच्या निर्देशानुसार उपसमिती तिचे कामकाज करेल आणि वेळोवेळी त्यांच्या कार्यवाहीचा अहवाल व्यवस्थापकीय समितीला देईल.

**२३. जिमखान्यातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि बडतर्फ करण्याचा अधिकार:**

जिमखान्याच्या कामकाजासाठी नियमित किंवा कंत्राटी पद्धतीने जिमखान्यातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा किंवा काढून टाकण्याचा किंवा पदोन्नती करण्याचा अधिकार व्यवस्थापकीय समितीला असेल.

**२४. पैसे खर्च करण्याचा अधिकार :**

जिमखान्याच्या उद्देशांसाठी किंवा उद्दीष्टांसाठी आवश्यक किंवा उपयुक्त असल्यास वेळोवेळी पैसा खर्च करण्याचा अधिकार व्यवस्थापकीय समितीला असेल,.

**२५. नियम आणि उपविधींचा अर्थ लावणे :**

अ) जिमखान्याच्या उपविधी/नियम आणि विनियम यांचा अर्थ लावण्याचा अंतिम अधिकार व्यवस्थापकीय समितीला असेल.

ब) या उपविधी/नियमांमध्ये समाविष्ट नसलेले कोणतेही मुद्दे व्यवस्थापकीय समितीद्वारे ठरवले जातील.

**२६. सभासदांच्या मालमत्तेचे नुकसान किंवा नुकसानीसाठी गैर-जबाबदारी:**

कोणत्याही सभासदाने किंवा त्याच्या/तिच्या अभ्यागतांनी जिमखाना परिसरात ठेवलेली कोणतीही वस्तू हरविल्यास किंवा वस्तुचे नुकसान झाल्यास त्यासाठी व्यवस्थापकीय समिती जबाबदार राहणार नाही.

**२७. खेळ आणि दावे:**

अ) जिमखान्यात कोणते खेळ खेळले जावेत हे व्यवस्थापकीय समिती ठरवेल. जिमखान्याच्या आवारात कोणत्याही प्रकारचा जुगार खेळण्यास परवानगी दिली जाणार नाही.

ब) व्यवस्थापकीय समितीने वेळोवेळी ठरवून दिलेल्या खेळाच्या वेळेच्या पलीकडे जिमखाना परिसरात खेळ खेळण्यास सभासदांना मनाई आहे.

**२८. अ) वार्षिक सर्वसाधारण सभा:**

अ) जिमखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा, आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत, दर वर्षी एकदा आयोजित केली जाईल. तथापि, अपवादात्मक प्रकरणांमध्ये व्यवस्थापकीय समितीला सदर सहा महिन्यांचा कालावधी शिथिल करता येऊ शकेल.

ब) सचिवालय जिमखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला फक्त आजीव सभासदांना उपस्थित राहण्याची परवानगी असेल.

क) वार्षिक सर्वसाधारण सभा किंवा विशेष सर्वसाधारण सभा घेण्यापूर्वी आजीव सभासदांना चौदा दिवसांची स्पष्ट नोटीस लेखी स्वरूपात दिली जाईल आणि कोणत्याही सभासदाला कोणतीही नोटीस न मिळाल्याने सभा अवैध ठरणार नाही आणि अशी सूचना सभासदाला जिमखान्याद्वारे वैयक्तिकरित्या किंवा ईमेल/एसएमएस/वॉट्सअ‍ॅपद्वारे किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यामाव्दारे किवा जिमखाना नोंदवहीमध्ये उपलब्ध त्यांच्या नवीनतम पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठविली जाईल.

तथापी, विहीत किमान कालावधी शिथिल करण्याचे अधिकार पदसिध्द उपाध्यक्षांकडे असतील.

**ब) वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज:**

वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज असे असेल-

१) जर असेल तर मागील सभेचे किंवा सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त/कार्यवृत्त कायम करणे;

२) वार्षिक अहवाल आणि लेख्यांचे लेखापरीक्षण विवरण विचारात घेणे व ते स्वीकृत करणे.

३) व्यवस्थापकीय समितीमधील रिक्त पदे निवडणूकीने भरणे,

४) लेखापरीक्षकाची निवड करणे आणि त्याचे मानधन निश्चित करणे.

५) सभेच्या 3 दिवस अगोदर देण्यात आलेल्या सूचनेच्या कोणत्याही विषयावर निर्णय घेणे.

६) अध्यक्षांच्या परवानगीने रीतसर पुढे आणलेला इतर कोणताही विषय.

ब) मतदान करण्याचा हक्क असलेल्या केवळ आजीव सभासदांसाठी वार्षिक महासभेच्या बैठकीच्या तारखेच्या ७ दिवस अगोदर वार्षिक अहवाल आणि लेखापरिक्षण विवरणपत्र जिमखाना कार्यालयात तपासणीसाठी खुले असेल.

**२९. विशेष सर्वसाधारण सभा:-**

अ) व्यवस्थापकीय समिती केव्हाही विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करु शकते.

ब) ५०० पेक्षा कमी नसलेल्या आजीव सभासदांनी स्वाक्षरी केलेली किंवा एकूण सभासद संख्येच्या एक चतुर्थांश सदस्य यापैकी जे कमी असेल ते व जे मतदान करण्यास पात्र असतील अशा सभासदांकडून मागणी आल्यास , अशी मागणी मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत अध्यक्ष विशेष सर्वसाधारण सभा बोलावतील.

क) विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ज्या विषयासाठी अशी बैठक बोलावली असेल, त्या विषयाचेच कामकाज करण्यात येईल. अशा बैठकीत इतर कोणत्याही विषयावर कामकाज केले जाणार नाही.

**३०. वार्षिक / विशेष सर्वसाधारण सभेची सूचना**:

कोणत्याही वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेची सूचना किमान चौदा दिवसांपूर्वी फलकावर लावून सभासदांना दिली जाईल. आणि अशी सूचना जिमखान्याद्वारे वैयक्तिकरित्या किंवा ईमेल/एसएमएस/व्हॉट्सॲपद्वारे किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे किंवा जिमखाना नोंदवहीमध्ये उपलब्ध त्यांच्या नवीनतम पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठविली जाईल.

तथापी, विहीत किमान कालावधी कमी करण्याचे अधिकार पदसिध्द उपाध्याक्षांकड असतील.

**३१. गणपूर्ती:**

अ) विशेष सर्वसाधारण सभेसह वार्षिक सर्वसाधारण सभेत, मतदानाचा हक्क असलेले १०० आजीव सभासद गणपुर्तीसाठी आवश्यक असतील. मागणी केल्यामुळे बोलावल्या व्यतिरिक्त कोणतीही वार्षिक सर्वसाधारण सभा गणपुर्तीअभावी तहकूब केली असल्यास, त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होणाऱ्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता नसेल.

ब) मागणी केल्यामुळे बोलावलेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या बाबतीत, सूचने मध्ये नमूद केलेल्या वेळी गणपूर्ती नसल्यास, सभा विसर्जित केली जाईल.

**३२. सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष:**

सर्व वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभांमध्ये, पदसिध्द अध्यक्ष आणि त्यांच्या अनुपस्थितीत पदसिध्द उपाध्यक्ष आणि पदसिध्द उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत व्यवस्थापकीय समितीचे सभापती आणि सभापतींच्या अनुपस्थितीत व्यवस्थापकीय समितीचे उपसभापती बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारतील. पदसिद्ध अध्यक्ष, पदसिद्ध उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय समितीचे सभापती आणि

उपसभापती यांच्या अनुपस्थितीत, उपस्थित सदस्य त्यांच्यापैकी एकाची  बैठकीसाठी अध्यक्ष म्हणून निवड करु शकतील.

**३३. वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील मतदान:**

अ) वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेतील मतदान हात उंचावून किंवा बैठकीचे अध्यक्ष ठरवतील त्या निर्णयानुसार होईल.

ब) मतदान बरोबरीच्या बाबतीत सभेच्या अध्यक्षास दुसरे किंवा निर्णायक मत देता येईल.

क) मताच्या निकालाविषयीच्या प्रश्नांवर अध्यक्षांचा निर्णय अंतिम असेल आणि सभा आयोजित केल्यापासून ३० दिवसांच्या आत सभेच्या अध्यक्षांनी स्वाक्षरी केलेल्या इतिवृत्त पुस्तकातील नोंद कोणताही ठराव तो मंजूर होण्याच्या अटींवर अंतिम असेल.

**३४. वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त:**

अ) कोणत्याही वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त व्यवस्थापकीय समितीने बैठक घेतल्यापासून ३० दिवसांच्या आत अंतिम केले जाईल.

ब) असे कार्यवृत्त मानद महासचिव यांच्याकडे अर्ज केल्यावर, मतदानाचा अधिकार असलेल्या कोणत्याही सभासदाला तपासणीसाठी खुले असेल.

**३५. नियमांमध्ये सुधारणा:**

**अ) नियम आणि विनियम बनविण्याचे अधिकार :-**

१) जिमखान्याच्या कारभाराच्या योग्य वर्तनासाठी आणि व्यवस्थापनासाठी हिताचे ठरेल असे सर्व नियम आणि विनियम (या नियमांशी विसंगत नाहीत असे), व्यवस्थापकीय समिती वेळोवेळी रद्द करु शकते किंवा त्यात सुधारणा करु शकते. परंतु, असे कोणतेही नियम व विनियमांचे, की जे निवडणुक प्रक्रियेशी संबंधित असतील, त्यात कोणतीही सुधारणा केली जाणार नाही, जोपर्यंत ते जिमखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत/विशेष सर्वसाधारण सभेत पारित केले जाणार नाहीत,

२) आवश्यकतेनुसार नियम आणि विनियमांचे पुनर्विलोकन केले जाईल.

**ब) नियम आणि विनियम रद्द करणे, सुधारित करणे किंवा बदलणे:-**

कोणतेही नियम आणि विनियम विशेषत: या हेतूने बोलाविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर केले जात नाहीत आणि त्या सभेला उपस्थित असलेल्या दोन तृतीयांश सदस्यांनी मंजूर केले जात नाहीत, तोपर्यंत ते रद्द केले जात नाहीत, बदलता येत नाहीत, त्यात फरक केला जात नाही, नवीन नियमांचा त्यात अंतर्भाव केला जात नाही.

**३६. आर्थिक वर्ष:**

जिमखान्याचे अर्थसंकल्प आणि वित्त लेखे तयार करण्याचे वित्तीय वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे असेल.

**३७. लेखापरीक्षण व खाते:**

अ) **लेखापरीक्षण** :

व्यवस्थापकीय समिती सनदी लेखापालाच्या नोंदणीकृत संस्थेद्वारे प्रत्येक आर्थिक वर्षात लेखा विवरणपत्रांचे लेखापरीक्षण करून घेईल, परंतु असे लेखा परीक्षक सलग तीन वर्षांपेक्षा जास्त काळ लेखापरीक्षण करणार नाहीत आणि केवळ २ वर्षांच्या अंतरानंतर ते पुनर्नियुक्तीसाठी पात्र असतील.

**ब) बँक खात्याचे संचालन आणि अग्रधन मर्यादा:**

अ) मानद महासचिव/ मानद खजिनदार यांचेकडे रु. ५०००/- किंवा व्यवस्थापकीय समिती ठरवील त्यानुसारची रक्कम ही अग्रधन म्हणून ठेवली जाईल.

आ) जिमखान्यास रोख रक्कम / धनादेश इत्यादीद्वारे मिळणारे सर्व उत्पन्न त्याच किंवा पुढील कामकाजाच्या दिवशी **शेड्युल्ड** किंवा सहकारी बँक किंवा राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये जमा केले जाईल.

इ) बँकिंग व्यवहार खालीलपैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांद्वारे संयुक्तपणे केले जातील.

खजिनदाराची स्वाक्षरी अनिवार्य असेल;

१) मानद महासचिव

२) मानद सहसचिव

३) मानद खजिनदार

**क) गुंतवणूक:-**

जिमखान्याला लगेच आवश्यक नाही असा पैसा गुंतविण्याचा आणि त्याबाबत व्यवहार करण्याचा अधिकार व्यवस्थापकीय समितीला असेल. अशी गुंतवणूक कोणत्याही अल्प आणि दीर्घ मुदतीच्या मुदत ठेवींमध्ये, शेड्युल्ड किंवा सहकारी किंवा राष्ट्रीयकृत बँकांमध्ये किंवा कंपनी निबंधक, महाराष्ट्र राज्य यांनी मंजूर केलेल्या रोख्यांमध्ये, वेळोवेळी योग्य वाटेल त्याप्रमाणे केली जाईल.

**ड) अर्थसंकल्प आणि वित्त:**

व्यवस्थापकीय समिती योग्य वाटेल त्याप्रमाणे वेळोवेळी अर्थसंकल्प आणि वित्तिय बाबींबाबत निर्णय घेऊ शकते.

**३८. तास:**

व्यवस्थापकीय समितीने वेळोवेळी ठरविलेल्या वेळेमध्ये जिमखाना सभासदांसाठी खुला असेल.

**३९. अभ्यागत:**

अ) व्यवस्थापकीय समितीने वेळोवेळी केलेल्या नियम आणि विनियमांच्या अधीन राहून फक्त मानद आश्रयदाता, आजीव सभासद आणि आश्रयदाता सभासद यांनी परिचय करुन दिलेल्या अभ्यागतांना जिमखान्यात परवानगी असेल. प्रत्येक अभ्यागतांना पाहुणे मानले जाईल आणि असे अभ्यागत परिचय करून देणाऱ्या सभासदासोबत असतील.

ब) अभ्यागतांना कोणताही खेळ खेळायचा असेल तर त्याला/तिला खेळण्याअगोदर अभ्यागत शुल्क भरावे लागेल. व्यवस्थापकीय समितीने वेळोवेळी निश्चित केलेले अभ्यागत शुल्क खेळाच्या ठिकाणी जमा केले जाईल.

क) अभ्यागत सभासदांचा प्रवेश व्यवस्थापकीय समितीने घालून दिलेल्या नियमांनुसार असेल.

**४०. जिमखान्याचा वापर व्यवसायासाठी केला जाऊ नये.**

अ) कोणत्याही सभासदाने जिमखान्याच्या उद्दिष्टांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी जिमखान्याच्या जागेचा वापर करण्यासाठी जिमखान्याचा पत्ता देऊ नये किंवा असा वापर करू नये.

ब) कोणताही सभासद किंवा अभ्यागत जिमखान्याच्या कर्मचाऱ्यांना कोणतेही पैसे, फी किंवा इतर वस्तू फुकट देणार नाही.

**४१. सभासदांचा पत्ता बदलणे :**

प्रत्येक सभासदाने त्याचा/तिचा पत्ता आणि इतर कोणत्याही बदलाची जिमखान्याकडे वेळोवेळी नोंदणी करावी. सभासदाला त्याच्या/तिच्या नोंदणीकृत पत्त्यावर कुरिअरने कागदपत्र पाठवलेले असतील तर ते योग्यरित्या वितरित केले गेले आहेत असे मानले जाईल.

**४२. जिमखाना मालमत्तेचे नुकसान:-**

कोणताही सभासद जो जिमखान्याच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान/तोटा करेल अशा सभासदाला सदर नुकसानीस/ तोट्यास जबाबदार धरले जाईल. तसेच सभासदाच्या अभ्यागतामुळे जिमखान्याच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान/तोटा झाल्यास त्यास तो सभासद जबाबदार असेल.

**४३. संस्थेचे विघटन :**

याबाबतीत सोसायटी नोंदणी अधिनियम १९६० कलम १३ आणि १४ च्या तरतुदीनुसार कार्यवाही केली जाईल.

**४४. या नियम आणि विनियमाची सुरुवात** :-

हे नियम आणि विनियम ९ जून, २०२५ पासून लागू होतील.

*********

## परिशिष्ट - I

## व्यवस्थापकिय समितीच्या निवडणुकीसाठी

## नियम क्र. २१ (फ) अंतर्गत तयार केलेले नियम

या नियमांना "सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीच्या निवडणुकीचे नियम असे म्हटले जाईल".

१. निवडणुकीच्या अगोदरच्या मार्च महिन्याच्या शेवटच्या तारखेला ज्यांची नावे आजीव सभासदांच्या यादीत आली आहेत तेच आजीव सभासद मतदानासाठी पात्र आहेत.

२. नामनिर्देशन पत्र जिमखाना कार्यालयातून कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० च्या दरम्यान मिळू शकतात. ....................पासून ते......................पर्यंत (सूचना फलकावर सूचना प्रदर्शित केल्यापासून एक आठवडा.)

३. कोणताही आजीव सभासद एकापेक्षा जास्त उमेदवारांना नामनिर्देशित करु शकत नाही.

४. अ) नामनिर्देशन लिखित स्वरूपात असेल, त्यामध्ये नामनिर्देशित व्यक्तीचे पूर्ण नाव आणि पत्ता (विभाग आणि निवासस्थान) स्पष्टपणे दर्शविले जाईल, तसेच जर नामनिर्देशित व्यक्ति जिमखान्याचा आजीव सभासद असेल तर नामनिर्देशनात त्या आजीव सभासदाचा जिमखाना सभासद क्रमांक आणि व्यवस्थापकीय समितीचे सदस्य म्हणून काम करण्याची त्याची इच्छा आहे या बाबी समाविष्ट असतील. सूचक आणि अनुमोदक (दोन्ही केवळ आजीव सभासद असले पाहिजेत) यांचे नाव आणि जिमखाना सभासद क्रमांक नमूद असेल.

ब) नामनिर्देशन अर्जासोबत रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) रोख, निवडणूक अनामत रक्कम म्हणून असेल.

क) बाराव्या विजयी उमेदवाराने मिळविलेल्या मतांपैकी १/४ मते मिळवण्यात उमेदवार अपयशी ठरल्यास त्या उमेदवाराचे निवडणूक अनामत जप्त होईल.

ड) वर नमूद केलेल्या नियम ४ (अ) आणि (ब) चे काटेकोरपणे पालन न केलेले नामनिर्देशन पत्र नाकारले जातील.

५. नामनिर्देशन पत्र जिमखाना कार्यालयात सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० च्या दरम्यान ..........' पासून..... पर्यंत

(यामध्ये दोन्ही दिवसांचा समावेश असेल), रविवार आणि अधिसूचित केलेल्या सुट्ट्यांचे दिवस वगळता स्वीकारण्यात येतील. (सूचना बोर्डवर सूचना प्रदर्शित केल्यापासून १५ दिवस.)

६. (अ) पीठासीन अधिकारी वरील नियम ५ मध्ये नमूद केलेल्या कालावधीनंतर पुढील कामकाजाच्या दिवशी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी करतील.

**अ. नामनिर्देशनपत्र खालील परिस्थितीमध्ये अवैध मानले जाईल:**

(१) वरील नियम ४(अ) आणि (ब) च्या तरतुदींनुसार केले नसल्यास,

(२) नामनिर्देशित केलेला उमेदवार वर नमूद केलेल्या नियम १ ते ३ अंतर्गत व्यवस्थापकीय समितीचा सदस्य होण्यास पात्र नसल्यास,

(३) नामनिर्देशनपत्र वर नमूद केलेल्या नियम ५ मध्ये नमूद केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर प्राप्त झाल्यास,

(४) नामनिर्देशन करणारा सभासद निवडणुकीत मतदान करण्यास पात्र नसल्यास,

(५) जर त्याच सभासदांकडून प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र वरील नियम ४ (अ) अंतर्गत परवानगी असलेल्या सभासदांपेक्षा जास्त असेल तर,

(६) जर ते कोणत्याही नियम आणि विनियमांचे पालन करत नसेल तर.

**ब**. सभापती किंवा त्यांच्या अनुपस्थितीत, उपसभापती, किंवा मानद महासचिव यांच्याकडून वैध नामांकनांची यादी नामनिर्देशनपत्रे मिळाल्याच्या शेवटच्या तारखेनंतर पंधरवड्याच्या आत, जिमखान्याच्या सूचना फलकावर प्रदर्शित केली जाईल.

७. (अ) आपले नामनिर्देशन मागे घेण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही सभासदाने, वैध नामांकन जिमखान्याचे नोटीस बोर्डावर प्रदर्शित झाल्यापासून १० दिवसांच्या आत सायंकाळी ७.०० वाजता किंवा त्यापूर्वी, जिमखान्याच्या कार्यालयाला तसे करण्याच्या त्याच्या इराद्याबद्दल योग्य ती सूचना द्यावी लागेल.

(ब) वैध नामनिर्देशनांची यादी जिमखान्याच्या सर्व सभासदांना वार्षिक अहवालासह आणि वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावण्याच्या सूचनेसह, निवडणुकीची तारीख, वेळ आणि ठिकाण नमूद करून पाठविली जाईल. निवडणुकीसाठी सभासदांना किमान १४ दिवसांची नोटीस द्यावी लागेल.

८. निवडणुकीच्या दिवशी जिमखाना इमारतीत कोणत्याही प्रकारचा प्रचार केला जाऊ नये.

९. मतदान मतपत्रिकेद्वारे केले जाईल. मतपत्रिकेवर सर्व उमेदवारांची नावे वर्णानुक्रमानुसार छापलेली असतील.

१०. प्रॉक्सीद्वारे मतदान करण्याची परवानगी नाही.

११. अ) निवडणूक नियमांच्या उद्देशाने, "पीठासीन अधिकारी→ या अभिव्यक्तीचा अर्थ असा आहे की जो निवडणूक लढवत नाही आणि ज्याची नियुक्ती व्यवस्थापकीय समितीने निवडणुकीमध्ये पीठासीन अधिकारी म्हणून काम करण्याच्या उद्देशाने केली आहे. "मतदान अधिकारी→ या अभिव्यक्तीचा अर्थ असा आहे की मतदान केंद्राचे प्रभारी अधिकारी म्हणून काम करण्यासाठी पीठासीन अधिकाऱ्याने विशेषत: नियुक्त केलेले सदस्य.

(ब) मतदान अधिकारी आणि निवडणूक लढविणारे उमेदवार यांची पीठासीन अधिकारी निवडणुकीच्या तारखेपूर्वी बैठक बोलावतील आणि त्यांना निवडणुकीच्या दिवशी पाळण्यात येणारी आचारसंहिता समजावून सांगतील.

(क) व्यवस्थापकीय समितीद्वारे पुरेशा संख्येने मतदान केंद्रांची व्यवस्था केली जाईल आणि एक किंवा अधिक मतदान अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल. जे मतदार त्यांचे ओळखपत्र (सचिवालय जिमखाना, सरकारी कार्यालय, चालक परवाना, पारपत्र, पॅन कार्ड) दाखवतील त्यांनाच मतदान अधिकारी मतपत्रिका देतील. जर कोणताही मतदार त्याच्या ओळखपत्राशिवाय मतदानासाठी आला तर त्याला पीठासीन अधिकाऱ्याकडे निर्देशित केले जाऊ शकते आणि ते जिमखान्याच्या नोंदीवरून त्यांच्या ओळखीची पडताळणी करतील.

१२. (अ) मतदान अधिकाऱ्यांकडून स्थळ प्रतीवर स्वाक्षरी करणाऱ्या प्रत्येक मतदाराला एक मतपत्रिका पुरविली जाईल. वरील नियम ११(क) द्वारे प्रदान केल्याप्रमाणे मतदान अधिकारी मतदाराच्या ओळखीबद्दल स्वतः चे समाधान करेल.

ब) मतदाराने मतदान केंद्रावर जाऊन त्याचे मत नोंदवावे आणि या हेतूने दिलेली मतपत्रिका मतपेटीत टाकावी.

१३. जो मतदार शारिरीक दुर्बलता किंवा इतर दोषांमुळे आपले मत नोंदवू शकत नाही, त्याला पीठासीन अधिकाऱ्याने नियुक्त केलेल्या व्यक्तीद्वारे मदत केली जाईल.

१४. (अ) मतदान सुरू होण्यापूर्वी, पीठासीन अधिकारी मतपेटी रिकामी असल्याबाबत उपस्थित असलेल्या उमेदवारांचे समाधान करतील आणि नंतर त्यांच्या उपस्थितीत ती बंद करून सील करतील.

(ब) मतदान सुरू होण्यापूर्वी पीठासीन अधिकारी छापलेल्या मतपत्रिका उपस्थित उमेदवारांना दाखवतील.

(क) मतमोजणी त्याच दिवशी केली जाईल.

(ड) पीठासीन अधिकारी मतमोजणी क्षेत्रात उमेदवारांना आणि/किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना उपस्थितीची परवानगी देऊ शकतात.

(इ) खालील परिस्थितीमध्ये मत अवैध मानले जाईल -

(१) जर त्यावर मतदाराची स्वाक्षरी असेल;

(२) ज्या उमेदवाराला मत दिले आहे ते चिन्हांकन ओळखण्यासाठी पुरेसे स्पष्ट नसल्यास;

(३) मतपत्रिकेमध्ये काही खाडाखोड असल्यास;

(४) जर या नियमांच्या तरतुदींनुसार मते दिली गेली नाहीत, म्हणजे जर दिलेली मते निवडून द्यायच्या पदांपेक्षा जास्त असतील.

१५. (अ) मतमोजणीच्या वेळी, प्रतिस्पर्धी उमेदवार किंवा त्याच्या/तिच्या अनुपस्थितीत, त्याच्या अधिकृत नामनिर्देशित व्यक्तीला उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाईल.

(ब) मतमोजणीनंतर, मतांची घोषणा झाल्यानंतर, अयशस्वी उमेदवार किंवा त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीला, त्याची इच्छा असल्यास, ३० मिनिटांत मतांची पुनर्मोजणी करण्यासाठी त्याच्या अपीलचे

कारण स्पष्टपणे नमूद करून, योग्य पुराव्यासह जिमखान्याच्या सभापतींकडे लेखी अपील करता येईल.

(क) सभापती अपीलावर विचार करतील आणि त्याची घोषणा करतील. अपीलकर्त्याला लेखी उत्तर देऊन लगेचच निर्णय घेतला जाईल आणि त्यांचा निर्णय अंतिम असेल.

(ड) ज्या रिक्त जागा भरावयाच्या आहेत त्यासाठी ज्या उमेदवारास सर्वात जास्त वैध मते प्राप्त झाली आहेत असा उमेदवार व्यवस्थापकीय समितीचा सदस्य म्हणून विजयी झाल्याचे सभेचे अध्यक्ष घोषित करतील. अशा विजयी घोषित केलेल्या सदस्यांची संख्या भरावयाच्या रिक्त पदांपेक्षा जास्त नसेल.

(इ) जर दोन किंवा अधिक उमेदवारांना समान मते मिळाली, तर सभापती फेरमोजणीचा आदेश देतील आणि जर फेरमोजणीनंतरही मतांची बरोबरी असेल, तर पीठासीन अधिकारी विजयी उमेदवाराची निवड चिठ्ठी काढून करतील.

१६. छाननीकर्त्यांचा एकमताने घेतलेला निर्णय अंतिम असेल. त्यांच्यात मतभेद झाल्यास, प्रकरण सभापतींकडे पाठवले जाईल, व त्यांचा निर्णय अंतिम असेल. छाननीकर्ते खालील स्वरूपामध्ये सभापतींना अहवाल सादर करतील;

(१) बॉक्समधील एकूण मतत्रिकांची संख्या;

(२) अवैध मतत्रिकांची एकूण संख्या;

(३) उमेदवारांची नावे व प्रत्येक उमेदवाराला मिळालेली एकुण मते .

१७. मतदानाचा निकाल सभापती किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उपसभापती आणि दोघांच्या अनुपस्थितीत मानद महासचिव मतदानाचा निकाल जाहीर करतील. निवडून आलेल्या उमेदवारांची यादी त्यानंतर, सभासदांच्या माहितीसाठी जिमखान्याच्या सूचना फलकावर रितसर प्रदर्शित केली जाईल.

१८. व्यवस्थापकीय समितीमध्ये जास्तीत जास्त १५ सदस्यांचा समावेश असेल, त्यापैकी १२ निवडून आलेले सदस्य असतील आणि नियम २१-अ मध्ये विहीत केल्यानुसार स्वीकृत सदस्य म्हणून घेतले जातील.

आणि निवडून आलेल्या १२ सदस्यांपैकी;

(१) दोन जागा महिला सदस्यांसाठी राखीव असतील आणि ;

(२) ज्या खेळाडूने आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावर भाग घेतला आहे किंवा ज्याने अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा/ कला स्पर्धेत भाग घेतला आहे त्यांच्यासाठी दोन जागा राखीव असतील.

(३) आठ (८) जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव असतील. (“सर्वसाधारण” म्हणजे सर्वांसाठी खुले राहील) परंतु जर एकच उमेदवार (i) (ii) आणि (iii) मध्ये नमूद केलेल्या एकापेक्षा जास्त प्रवर्गातून निवडून आला असेल, तर त्याला/ तिला निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत फक्त एक

जागा ठेवण्याचा आणि दुसऱ्या जागेवरुन निवृत्त व्हावे लागेल. अशी रिक्त जागा सदर प्रवर्गातील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वाधिक मताधिक्याकडून भरली जाईल.

१९. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, अशा सभासदांना:

अ) नियम २९ अंतर्गत बोलावलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत किंवा नियम ३० अंतर्गत बोलावलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अशा सभासदांना मतदान करण्याचा अधिकार असेल, की, ज्या सभासदाची गेल्या आर्थिक वर्षाच्या ३१ मार्च रोजी किंवा त्यापूर्वी आजीव सभासद म्हणून नोंदणी केली गेली असेल आणि अशा बैठकीच्या तारखेपूर्वी तो सतत जिमखान्याचा आजीव सभासद असेल आणि त्याच्याकडून जिमखान्याला करावयाच्या कोणत्याही प्रदानाची थकबाकी नसेल.

ब) जर एखाद्या सभासदाने व्यवस्थापकीय समितीची निवडणूक लढवली असेल आणि तो अशा निवडणूकीत पराभूत झाला असेल, असा सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी व्यवस्थापकीय समितीवर स्वीकृत सदस्यत्वासाठी किंवा व्यवस्थापकीय समितीच्या निवडणुकीसाठी पात्र नसेल.

स्पष्टीकरण: या नियमाच्या हेतूसाठी, "सभासद→ या शद्वाचा अर्थ फक्त आजीव सभासद असा होईल.

२०. निकाल जाहीर झाल्यानंतर, मतदानाची कागदपत्रे सीलबंद करून सहा महिन्यांसाठी जिमखाना कार्यालयात ठेवली जातील, त्यानंतर मा. महासचिवाच्या संमतीने ती नष्ट केली जातील.

*********